# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 19/08/2023 (शनिवार) दुपार


### जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक
### स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीणची कारवाई

आज दिनांक १९/०८/२०२३ रोजी पोलीस स्टेशन मौदा परीसरात स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पेट्रोलिंग करीत असता मुखबीरद्वारे खबर मिळाली की, पीकअप महिंद्रा क्र. MH–४०/Y–०९६८ या वाहनाने बेकायदेशीरपणे गोवंश यांना त्यांची चारा पाण्याची सोय न करता गाडी मध्ये कोंबून कत्तलीकरीता देवळी गोंदिया –मौदा मार्गे येथून नागपूर कडे वाहनात घेऊन जात आहे. यावर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मौजा माथनी शिवारात टोल नाका भंडारा नागपूर हाईवे वर नाकाबंदी करून त्याला थांबविले असता सदर गाडीची पाहणी केली असता सदर वाहन क्रमांक MH–४०/Y–०९६८ चा चालक **आरोपी नामे– १) शेख सलीम शेख अकबर रा. मोमिंनपुरा नागपूर २) मोहम्मद सांकिब मोहम्मद नरूल्ला शेख, रा. उपलवाडी नागपूर फरार आरोपी ३) प्रेमलाल भैयालाल राऊत, रा. टाकळघाट नागपूर ४) शेख अल्तामस रा. पिवळीनदी नागपुर** हे गाडीचे मागील डाल्यात १२ गोवंश क्रूरतेने कोंबून बांधुन वाहतूक करतांना मिळुन आले. त्यांच्या ताब्यातून १) महिंद्रा वाहन क्र. MH-४०/Y–०९६८ किंमती ६ लाख रु. २) १२ गोवंश किंमती ९६ हजार ३) मोबाईल किंमती २ हजार असा एकूण ६ लाख ९८ हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर जप्ती मुदेमाल वाहनासह पूढील कार्यवाही कामी पो.स्टे. मौदा यांचे ताब्यात देण्यात असून त्याचे विरुद्ध कलम ११(१) ड प्राणी संरक्षण कायदा ५ (१) ब, ९ प्राण्यांना निर्दयतेने वागणूक कायदा १८४, १३०/१७७ मोवाका. सहकलम ३४, १०९ भा.दं.वी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोलीस स्टेशन मौदा करीत आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर (ग्रामीण) श्री. विशाल आनंद सर (भा.पो.से.) तसेच अपर पोलीस अधीक्षक डॉ. श्री. संदीप पखाले साहेब यांचे मार्गदर्शनात गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे, पोलीस हवालदार विनोद काळे, मयूर ढेकले, पोलीस अंमलदार राकेश तालेवार यांनी पार पाडली.



## घरफोडी

पो.स्टे. बेला :– अंतर्गत १० कि. मी. अंतरावरील मौजा पिपरा येथे दिनांक १८/०८/२०२३ चे १२.०० वा. ते १५.०० वा. दरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादी नामे– गं. भा. बेबीबाई फकिराजी उमाटे, वय ६५ वर्ष, रा. वार्ड क्र. २ पिपरा ता. उमरेड जिल्हा नागपुर याचे घराचे मागील बाजूस किचन रूमचे दरवाजाची कडी तोडून आत प्रवेश करून फिर्यादीचे लग्नामध्ये वडीलांनी दिलेले जुने पुराणे १) सोन्याचे नथ/मुखरे दोन जोड वजन २५ ग्रॅम किंमती २५,०००/– रूपये २) सोन्याचे गौसूऱ्या दोन जोड वजन २५ ग्रॅम किंमती २५,०००/– रूपये ३) सोन्याची गोप/चैन वजन १५ ग्रॅम किंमती १५,०००/– रूपये ४) सोन्याची अंगठी ५ ग्रॅम किंमती ५०००/– रूपये असा एकुण ०७ तोळा किंमती ७०,०००/–रूपये व चांदीचे पाटल्या ६ तोळे किंमती ३०००/– रूपये असा एकूण ७३,०००/–रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरी करून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बेला येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार सत्येंद्र रंगारी मो. नं. ७९७२२७५१६२ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**